# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
## उप - आयुक्त - ३ यांचे कार्यालय
पत्ता - इंद्रभुवन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर

जा.क्र./उआ/वे/ ८८ दि.03/१०/२०२५

## जाहिर प्रसिध्दीकरण

सोलापूर महानगरपालिकेतील मुख्य लेखापरिक्षक, अंतर्गत लेखा परिक्षक व मुख्य लेखा अधिकारी कार्यालयाकडील विविध देयके अदा करणेबाबतच्या दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक र.रु. १०/- लाखचे मर्यादेमध्ये संगणक आज्ञावली तयार करणेकरीता म.न.पा. संकेतस्थळावरून भावपत्रके मागविण्यात येत आहे. सदरच्या निविदेचा तपशील पुढीलप्रमाणे-

| अ.क्र. | तपशील | बयाणा रक्कम | सुरक्षित रक्कम | कामाची मुदत | निविदा फी (GST सहीत) |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुख्यलेखापरिक्षक, अंतर्गत लेखापरिक्षक व मुख्य लेखा अधिकारी कार्यालयाकडील विविध देयके अदा करणेबाबतच्या दैनंदिन कामकाजासाठी उपयुक्त मा.स्थायी समिती यांचे मान्यतेअंती निश्चित होणाऱ्या नमुन्यानुसार व्हॉटसअप मेसेजसह Web Based संगणक आज्ञावली तयार करणेबाबत | १९०००/- | १००००/- | ३० दिवस | ३८००/- |
| २ | निविदा तारीख व वेळ | | दि.03/१०/२०२५ ते दि.१०/१०/२०२५ अखेर दुपारी. ०१.०० वाजेपर्यंत | | |
| २ | बयाणा रक्कम भरणेची तारीख, वेळ व ठिकाण | | दि.03/१०/२०२५ ते दि.१०/१०/२०२५ अखेर दुपारी. ०१.०० वाजेपर्यंत मुख्य लेखा अधिकारी कार्यालय | | |
| ३ | भरलेले सिलबंद निविदा स्वीकारणेची अंतिम तारीख , वेळ व ठिकाण | | दि.03/१०/२०२५ ते दि.१०/१०/२०२५ अखेर दुपारी. ०१.०० वाजेपर्यंत सामान्य प्रशासन विभाग | | |
| ४ | निविदा उघडण्याची तारीख , वेळ व ठिकाण | | दि.१३/१०/२०२५ रोजी दुपारी. ०४.०० वाजता सामान्य प्रशासन विभाग | | |

**अटी व शर्ती :-**

१. उपरोक्त नमूद कामासाठी भावपत्रक सादर करणेचे आहे.

२. इच्छूक मक्तेदाराने त्यांचे नोंदणी प्रमाणपत्र, बयाणा व निविदा फी भरलेली पावती, पॅन कार्ड, जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र भावपत्रकासोबत सादर करणेत यावी.

३. सदरचे दर संगणक आज्ञावली तयार करणे, प्रशिक्षण देणे व पुढील एक वर्षाकरीता देखभाल दुरुस्ती देयकासहीत देणेत यावेत.

४. दरपत्रकामधील दर हे सर्व करांसहित देणेत यावेत.

५. मंजूर होणाऱ्या रक्कमे व्यतिरिक्त अन्य कोणतीही रक्कम देय राहणार नाही अगर रक्कम वाढवून मिळणार नाही.

६. दरपत्रक हे सिलबंद लिफाफा मध्ये सो.म.पा., सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करणेचे आहे.

७. मनपाच्या कामकाजामध्ये सुकरता येणेच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार वेळोवेळी संगणक आज्ञावलीमध्ये सुधारणा करुन देणे संबंधित मक्तेदारावर बंधनकारक राहणार आहे.

८. संगणक आज्ञावलीमध्ये अंतर्भूत करावयाच्या बाबींचा सविस्तर तपशील, नमुने सामान्य प्रशासन विभागाकडे मिळू शकेल.

९. सदरच्या निविदेकरीता मा.आयुक्त यांचा निर्णय निविदाधारकांना अंतिम राहील.

१०. कोणतेही दरपत्रक स्वीकारणे अथवा नाकारणेचा अधिकार मा.आयुक्त यांचा राहिल.

**(आशिष सुमन सुधाकरराव लोकरे)**
**उपायुक्त - सा.प्र.वि.**
**सोलापूर महानगरपालिका,सोलापूर**